# तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय,सेलू

(संकलनः- आस्थापना विभाग)

दुरध्वनी क्रमांकः- 02451 - 222334 ईमेल आयडीः- tahsilselu@gmail.com

जा.क्र./291/2023/आस्था/को.पद.जाहिरात-2023/कावि-313 दिनांकः- 28/07/2023.

प्रति,

मा.वरिष्ठ तांत्रिक संचालक तथा जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी,
राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,परभणी.

**विषयः-** कोतवाल पदभरती 2023.
जाहिरात प्रसिद्ध करणे बाबत.

**संदर्भः-** मा.जिल्हाधिकारी,परभणी यांचे आदेश क्र.जा.क्र./2022/अ-2/आस्था-1/सिआर-04 दि.21/07/2023.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने तहसील कार्यालय,सेलू यांचे आस्थापनेवरील कोतवाल या संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात या सोबत पाठविण्यात येत आहे. सदरिल जाहिरात परभणी जिल्ह्याचे अधिकृत संकेतस्थळ https://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी ही विनंती.

**सोबतः-** जाहिरात.

(दिनेश झांपले)
**सदस्य सचिव,तालुका निवड समिती**
**तथा तहसिलदार,सेलू.**

तहसीलदार, सेलू

**प्रतिलिपीः-** मा.अध्यक्ष,तालुका निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी,सेलू यांना माहितीस्तव सविनय सादर.

-स्वा-
(दिनेश झांपले)
**सदस्य सचिव,तालुका निवड समिती**
**तथा तहसिलदार,सेलू.**

E:\64 -\Est\पदभरती कोतवाल\KOTWAL PADBHARTI 2023.docx



Scanned with CamScanner

# तालुका निवड समिती,सेलू

**कोतवाल पदाची सरळ सेवा भरती निवड प्रक्रिया - 2023**

जाहिरात क्रमांकः- जा.क्र./290/2023/आस्थापना/को.पद.जाहिरात-2023/कावि-313, दि.27/07/2023.

(शिक्का: तहसील कार्यालय, सेलू, ता.सेलू जि.परभणी)

---

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक केओटी-2012/प्र.क्र.432/ई-10,दि.05 सप्टेंबर 2013 व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि.17/05/2023 अन्वये शासन निर्णय क्रमांक पीकेए 1059/VI-L,बॉम्बे सरकार,सचिवालय,बॉम्बे दिनांकः-07 मे 1959 कोतवाल सेवाप्रवेश नियमानुसार कोतवालांची रिक्त पदे भरती करणे बाबत आदेशित करण्यात आल्यामुळे मा.जिल्हाधिकारी,परभणी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र./2022/अ2/आस्था-1/सिआर-04 दि.21/07/2023 अन्वये तहसिलदार,सेलू यांचे आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गामधील मा.विभागीय आयुक्त,मागासवर्गीय कक्ष,औरंगाबाद यांचे बिंदुनामावली तपासणी अहवाल क्रमांक जा.क्र./2023/मावक/कक्ष-2/सिआर-187/कावि- दि.03/07/2023 नुसार रिक्त पदे भरण्याकरिता खालीलप्रमाणे प्रवर्गनिहाय उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कोतवालांच्या रिक्त पदांचे आरक्षण**

(मासिक एकत्रित मानधन रुपयेः- 15000/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण (महिला) | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती | 1 | 3 | 4 |
| 2 | अनुसूचित जमाती | 0 | 1 | 1 |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 0 | 1 | 1 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 1 | 1 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 1 | 1 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 1 | 1 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 1 | 1 |
| 8 | ईतर मागास प्रवर्ग | 2 | 3 | 5 |
| 9 | आर्थीक दृष्टया मागास प्रवर्ग | 1 | 1 | 2 |
| 10 | खुला | 3 | 7 | 10 |
| | एकुण | 7 | 20 | 27 |

टीपः- 1.पदाच्या एकुण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

2.महिलांसाठी आरक्षित पदावर महिला उमेदवार न मिळाल्यास शासन निर्णय महिला व बालविकास विभाग यांचे निर्णय दि.25/05/2001 अन्वये त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन सदर पदे भरण्यात येतील.

**अटी व शर्ती**

**1.शैक्षणीक अर्हताः-**

1.1 उमेदवार हा किमान चौथी उत्तीर्ण असावा.

1.2 उमेदवारास मराठी भाषा लिहीता व वाचता येणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

**2.वयोमर्यादाः-**

2.1 उमेदवाराचे वय दि.31.07.2023 रोजी 18 वर्षे ते 40 वर्षे दरम्यान असावे.

2.2 कोतवाल हे पद वर्ग चार संवर्गात मोडत नाही व सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे अपंग,प्रकल्प/भुकंपग्रस्त,अंशकालीन,खेळाडु,माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेल्या वयोमर्यादेत शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागू असणार नाही.

3.उमेदवार हा **सेलू** तालुक्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे तसेच अर्जासोबत महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र व लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

4.निवड झालेल्या उमेदवारांनी शारिरिक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

5.या जाहिराती अन्वये करण्यात येणारी भरती संपुर्ण तालुका हा घटक गृहीत धरुन करण्यात येत असल्यामुळे निवड होणा-या उमेदवारांच्या नियुक्तीसाठी त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांचा कोणताही विचार न करता तालुका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल व तालुका अंतर्गत बदलीस पात्र राहतील.त्याकरिता उमेदवाराने रु.100 चे बंधपत्र (बॉन्ड) देणे आवश्यक आहे.

6.उमेदवारांची नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची राहिल.

7.कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाहीत.

8.मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि.12/12/2011 अन्वये संबंधित उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती दिली जाईल.जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहुन दिल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा संपुष्टात येईल.

9.अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी चालु आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडल नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करुन आवेदन पत्रासोबत जोडावी.(नॉन क्रिमिलेअर चे तत्व अनुसूचित जाती / अनुसुचित जमाती या प्रवर्गाव्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील.)

10.आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ई.डब्ल्यु.एस.) उमेदावारांकरिता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ,दि.12/02/2019 व दिनांकः- 31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**11.महिला उमेदवारांकरिताः-**

11.1 महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दि.04/05/2023 अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

11.2 अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छीणा-या महिलांनी त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**12.परीक्षा शुल्कः-**

**सदर परिक्षेकरिता खालीलप्रमाणे शुल्क राहील.**

12.1 मागासवर्गीय उमेदवाराकरिता 400/- रुपये.

12.2 खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता 500/- रुपये.

वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क तहसिलदार,सेलू या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी.(डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर करावा. (परीक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस तसेच त्यावरील देय कर वगळुन आहेत.)

12.3 परीक्षा शुल्क (Non Refundable) राहील.

**13.निवड पध्दतीः-**

13.1 महसुल व वन विभाग शासन निर्णय दि.17/05/2023 नुसार 100 गुणांची लेखा परीक्षा असेल.लेखी परीक्षा



Scanned with CamScanner

दिनांक:-10/09/2023 रोजी प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात आलेल्या वेळी व ठिकाणी घेण्यात येईल.

13.2 गुणवत्ता क्रम हा लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर म्हणजेच एकूण 100 गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहिल.

13.3 लेखी प्रश्नपत्रिका इयत्ता चौथी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

13.4 लेखी परिक्षेत सामान्य ज्ञान,अंकगणित,मराठी भाषा विषय व जिल्ह्याची भौगोलिक माहिती यांचा समावेश राहिल.

13.5 लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता धारण करणा-या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

13.6 समसमान गुण असल्यास दि.27.06.2008 चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

13.7 निवड करण्यात आलेले उमेदवार निवड झाल्यापासुन 15 दिवसाच्या आत रुजु न झाल्यास प्रतिक्षाधीन यादी मधील दुसरे उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल.

**14.अर्ज कसा करावा ?**

14.1 सदर पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना तहसील कार्यालय,सेलू येथे रुपये 20/- शुल्क भरुन उपलब्ध होईल.तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर https://parbhani.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

14.2 जाहिराती सोबत प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज त्यामधील माहिती / तपशील सुस्पष्टपणे नमूद करुन सादर करावा.

14.3 अर्जासोबत स्वतःचे नाव व पता नमुद केलेले 24 से.मी. x 11 से.मी. आकाराचा 30 रुपयांचे पोस्टाचे तिकिट लावलेला लिफाफा जोडावा.

14.4 उमेदवाराने त्याचे अलीकडील काळातील छायाचित्र आवेदन पत्रावर विहीत जागी स्वयंसाक्षांकित करुन घट्ट चिकटवावे.

14.5 शैक्षणीक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

14.6 अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करुन जोडावी.

14.7 अनुसूचित जाती / अनुसुचित जमाती व्यतिरिक्त सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे चालु आर्थिक वर्षातील नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

14.8 महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

**15.अर्ज स्विकारण्याचा अंतीम दिनांक व कार्यालयाचा पत्ता:-**

15.1 उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज सहपत्रासह तहसिल कार्यालय,सेलू येथे समक्ष अथवा दि.17/08/2023 पर्यंत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने दाखल करावेत.

15.2 विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही तसेच या संबंधाने उमेदवारांसोबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

16. विहीत नमुन्यातील नसलेले अर्ज,विहीत शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराच्या अर्ज,विहीत शैक्षणीक अर्हता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज,अपूर्ण,चुकीचे भरलेले अर्ज,फोटो नसलेला व स्वयंसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

17. या जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी शासनाकडे,जिल्हाधिकारी कार्यालयास,उपविभागीय कार्यालयास किंवा तहसिल कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

18. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी अन्यथा सदरील अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

19. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी अंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी तहसिल कार्यालय,सेलू येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.पात्र असलेल्या उमेदवारांना परीक्षेचे स्थळ व वेळ प्रवेशपत्राद्वारे लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

20. लेखी परिक्षेसाठी उमेदवारांनी प्रवेश पत्रावरील दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

21. ज्या उमेदवारांना पोस्टाने प्रवेशपत्र प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांनी ठरवुन दिलेल्या कालावधीत तहसिल कार्यालय,सेलू येथुन प्रवेश पत्र हस्तगत करावीत.

**22.उत्तर तालीका:-**

22.1 उत्तर तालीका तहसिल कार्यालय,सेलू येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

23 लेखी परिक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांकाचे यादीसह तहसिल कार्यालय,सेलू व उपविभागीय अधिकारी



Scanned with CamScanner

कार्यालय,सेलू येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

24 अंतीम निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू येथे होईल.मूळ कागदपत्रांची पडताळणीत पात्र उमेदवारांचीच निवड वैध समजण्यात येईल.कागदपत्रे पडताळणी नंतरच अंतीम निवड यादी तहसिल कार्यालय,सेलू व उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

25.कोतवाल भरतीचा कालबद्ध कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | कालावधी (दिनांक) | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1. | अर्ज दाखल करणे | दि.01/08/2023 (मंगळवार) ते दि.17/08/2023 (गुरुवार) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय,सेलू |
| 2. | लेखी परिक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची छाननी करुन यादी प्रसिद्ध करणे | दि.22/08/2023 (मंगळवार) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय,सेलू उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांच्या अधिकृत संकेतस्थळावर https://parbhani.gov.in |
| 3. | ज्यांना प्रवेशपत्र पोस्टाने प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांना तहसिल कार्यालयातुन प्रवेशपत्र देणे | दि.07/09/2023 (गुरुवार) ते दि.08/09/2023 (शुक्रवार) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय,सेलू |
| 4. | लेखी परीक्षा | दि.10/09/2023 (रविवार) | प्रवेश पत्राद्वारे पोस्टाने कळविण्यात येईल. | प्रवेश पत्राद्वारे पोस्टाने कळविण्यात येईल. |
| 5. | प्राथमिक उत्तर तालिका प्रसिद्ध करणे | दि.10/09/2023 (रविवार) | सायंकाळी 06.00 वाजता | तहसिल कार्यालय,सेलू उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्या यांच्या अधिकृत संकेतस्थळावर https://parbhani.gov.in |
| 6. | प्राथमिक उत्तर तालिका प्रसिद्ध झाल्यावर त्यावर काही आक्षेप/हरकती असल्यास त्या सादर करणे. | दि.11.09/2023 (सोमवार) | दु.03.00 वाजेपर्यंत | तहसिल कार्यालय,सेलू |
| 7. | अंतिम उत्तर तालिका प्रसिद्ध करणे | दि.11/09/2023 (सोमवार) | संध्याकाळी 05.00 वाजेपर्यंत | तहसिल कार्यालय,सेलू, उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्या यांच्या अधिकृत संकेतस्थळावर https://parbhani.gov.in |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | लेखी परिक्षेतील गुणवत्ता क्रमानुसार पात्र उमेदवारांची अटी व शर्तीच्या अधीन राहुन तात्पुरती यादी प्रसिद्ध करणे. | दि.15/09/2023 (शुक्रवार) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय,सेलू, उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्या यांच्या अधिकृत संकेतस्थळावर https://parbhani.gov.in |
| 9. | निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी व आदेश निर्गमित करणे. | दि.20/09/2023 (बुधवार) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय,सेलू, उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्या यांच्या अधिकृत संकेतस्थळावर https://parbhani.gov.in |

26. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्भवल्यास निवड प्रक्रिया स्थगित किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.
27. उमेदवारांनी उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अपात्र ठरवून उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
28. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.
29. लेखी परीक्षा व कागदपत्रे पडताळणीसाठी येण्या जाण्याचा खर्च उमेदवारास स्वतः करावा लागेल.
30. जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतीम राहील.
31. वरील अटी व शर्ती,नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागु राहतील.
32. सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमुना तहसिल कार्यालय,सेलू व उपविभागीय अधिकारी,सेलू येथील नोटीस बोर्डावर तसेच जिल्हाधिकारी,परभणी यांचे अधिकृत संकेतस्थळ https://parbhani.gov.in यावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.
33. वरील नमुद जाहीरातीमध्ये / वेळापत्रकामध्ये / निवडप्रक्रियेमध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती तहसिल कार्यालय,सेलू,उपविभागीय अधिकारी कार्यालय,सेलू येथील नोटीस बोर्डावर तसेच मा.जिल्हाधिकारी,परभणी यांचे https://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**दिनांकः-** 31/07/2023.
**स्थळः-** सेलू.

(दिनेश झांपले)
**सदस्य सचिव,तालुका निवड समिती**
तथा तहसिलदार,सेलू.
तहसीलदार,सेलू

तहसील कार्यालय,सेलू ता.सेलू जि.परभणी

(शैलेश लाहोटी)
**अध्यक्ष,तालुका निवड समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी,सेलू.**
उप विभागीय अधिकारी
सेलू.

**प्रतिलिपीः-**

1. मा.जिल्हाधिकारी,परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा.उपविभागीय अधिकारी,सेलु यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. वरिष्ठ तांत्रिक संचालक तथा जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी,राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,परभणी यांना https://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

E:\64 -\Est\पदभरती कोतवाल\KOTWAL PADBHARTI 2023.docx



Scanned with CamScanner

4. जिल्हा माहिती अधिकारी, परभणी यांना तालुकास्तरावरील **(दोन)** वर्तमान पत्रात प्रसिध्दीसाठी.
5. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,सेलू यांना त्यांच्या नोटीस बोर्डवर व तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयावर डकवुन पंचनामा सादर करणे.
6. मुख्याधिकारी, नगर परिषद,सेलू यांना त्यांच्या नोटीस बोर्डवर डकवुन पंचानामा सादर करणे.
7. सर्व तलाठी तालुका,सेलू यांनी त्यांचे नेमुण दिलेल्या साझावर व साझाअंतर्गत प्रत्येक गावात डकवुन पंचनामा सादर करणे.
8. श्री.शेख शकील,शिपाई, तहसिल कार्यालय,सेलू यांनी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकवुन पंचानामा सादर करावा.

(दिनेश झांपले)
**सदस्य सचिव,तालुका निवड समिती**
**तथा तहसिलदार,सेलू.**
तहसीलदार, सेलू

तहसील कार्यालय, सेलू
ता. सेलू जि. परभणी

(शैलेश लाहोटी)
**अध्यक्ष,तालुका निवड समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी,सेलू.**
उप विभागीय अधिकारी
सेलू.



Scanned with CamScanner